

: प्रकरण पहिले :

# मराठी साहित्याची धावती वाटचाल

## :- प्रकरण पहिले -:

### मराठी साहित्याची धावती वाटचाल :

मराठी साहित्याच्या वाटचालीचे सिंहावलोकन करीत असताना प्राचीन, अर्वाचीन आणि आधुनिक असे तीन कालखंड आढळतात. भारतीय संस्कृती ही देवधर्मावर आधारलेली असल्यामुळे भारतीय माणूस पूर्वी पासूनच धर्म जीवनाची तत्वे आचरत आलेला आहे.

प्राचीन वाङ्:मयात देवादिकांच्या गोष्टी, निसर्ग, देवतुल्य व्यक्ती आणि समाजातील उच्च स्तर यांचे वर्णन केल्याचे आढळते. यामध्ये रामकृष्ण, ऋषीमुनी, देवाधिदेव यांच्या कहाण्या वा गोष्टी बोधप्रद म्हणून सांगितल्या आहेत. भारतीय समाजाचा मूळ जीवन धागा धार्मिक असून धर्म ग्रंथातील जो आचार सांगीतला आहे त्या आचाराप्रमाणे तो वागत आला आहे. वागतो आहे, त्या वेळी धर्मपंडीत आणि धर्मग्रंथ हे समाजाचे नेतृत्व करीत होते. आणि त्या मुळे धर्मग्रंथातील आचाराचा पगडा समाजावर पडलेला होता. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत संस्कृत ग्रंथ इत्यादी धार्मिक ग्रंथामध्ये भारतीयांचे समाज जीवन ग्रंथीत केलेले आहे.

पुढील संत काळात पंडीत कवींच्या काळात हेच जीवन थोडया फार फरकाने आपल्याला आढळते. संतांनी भक्ती आणि भक्तीतून मुक्तीचा मार्ग सांगीतला. पंडीतांनी रामायण महाभारतातील

कथानके घेऊन दीर्घ आख्याने लिहिली. आणि त्यांच्या वाचनाने मोक्ष प्राप्ती होईल असे सूचीत केले. शाहिरी काव्यात मात्र थोडा फार फरक जाणवतो. आणि पेशवाईतील जीवनाची स्थिती गती त्यात चित्रित झालेली दिसते. या सर्व जुन्या काळातील साहित्यामध्ये देवत्वाचा आविष्कार झालेला असून सर्व सामान्य माणसाच्या भाव भावनांचा आविष्कार अभावानेच झालेला दिसतो. एकनाथांनी म्हटल्या प्रमाणे "सगुण चरित्रे, परम पवित्रे, सादर वर्णावी" हीच त्या वेळच्या पंडीत ग्रंथकारांची, संत महंताची भूमिका होती.

ही सृष्टी ईश्वराने निर्माण केली. त्या सृष्टीतील आपण एक क्षुद्र घटक असून त्या जगनियंत्याच्या अधिकारानेच माणूस आपले जीवन व्यतीत करतो. त्या जगनियंत्याची भक्ती करून या देहाला मुक्ती मिळवावी हाच एक विचार जुन्या वाङ्‌मयात प्रकर्षाने आढळतो. जुन्या काळातील संत व पंडीत यांनी मराठीत लिहिले. बाकी सर्व वाङ्‌मय संस्कृत भाषेत लिहिले गेले आहे, आणि संस्कृत भाषा ही सर्व सामान्य माणसाला कळत नव्हती. त्यामुळे व्यक्तीगत भाव भावनांचा आविष्कार करणे, मनातील रागा लोभाचे प्रकटीकरण करणे या गोष्टी त्या काळात अभिप्रेत नव्हत्या.

ज्या वेळी ब्रिटीशांचे भारतात आगमन झाले. ते व्यापार करण्यासाठी म्हणून भारतात आले आणि या देशाचे राज्यकर्ते झाले. ब्रिटीशांनी आपल्या बरोबर शास्त्रीय ज्ञान, सुधारणावादी दृष्टी व न्याय या बरोबरच आपले प्रगत साहित्य आणले. त्यांच्याकडे लोकशाही

बध्दमूल झालेली होती. लोकशाहीच्या तत्वांनी सर्व सामान्य माणसाला आपल्या अस्तित्वाची जाणीव दिली. आपल्या हाताखाली काम करण्यासाठी हिंदुस्थानातील लोक तयार व्हावेत म्हणून त्यांना इंग्रजी शिक्षण दिले. आणि भारतातील पहिली पिढी इंग्रजी शिक्षणाने तयार झाली. इंग्रजी वाड्:मय कथा, कादंबरी, नाटक, निबंध, चरित्र, आत्मचरित्र, लघुकथा, नवनाटय इत्यादी वाड्:मय प्रकाराने समृध्द होते. महाराष्ट्रामध्ये मूठभर उच्चवर्णीय सुशिक्षित लोक होते त्यांना संस्कृतचे ज्ञान होते, मराठी भाषेचे ज्ञान होते, आणि इंग्रजांच्या संपकानि जे इंग्रजी शिकले त्यांना आपल्या मराठी साहित्यामध्ये अपूर्णतेची जाणीव झाली. इंग्रजी वाड्:मयातील शाखा जशा बहरलेल्या आहेत तशा मराठी वाड्:मयातील शाखा बहरलेल्या दिसत नव्हत्या आणि त्यामुळे पहिल्या पिढीतील इंग्रजी शिकलेल्या लोकांनी इंग्रजी साहित्याचे स्मांना-भाषांतराला प्रारंभ केला आणि इंग्रजी वाड्:मयाचे दालन खुले झाले.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात विचारवंतांनी राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक सुधारणांचा विचार लोकमानसात रुजविण्याचा प्रयत्न चालू केला होता. अज्ञान आणि अंधरूढी यांनी समाज ग्रस्त झालेला होता. त्यामुळे लोकांच्या मनामध्ये राजकीय जागृती बरोबर समाज जागृती आणि समाजसंघटन यांची प्रक्रिया सुरु झाली होती. टिळकांच्या मृत्युनंतर महात्मा गांधीजी यांच्याकडे राजकीय नेतृत्व आले. ब्रिटीश या देशातून गेल्याशिवाय भारतीय समाजाची सर्वांगीण प्रगती होणे शक्य नाही. असे समजून

गांधीजींनी भारतीयांच्या मनात इंग्रजांच्या विरुद्द असंतोष निर्माण करण्याचा प्रयत्न चालविला होता. इकडे सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात नविन विचार रुजत चाललेला होता. या देशामध्ये ऐंशी टक्के लोक ग्रामीण भारतात, खेडयापाडयांत राहतात त्यांना ही गांधीजीनी स्वराज्याची प्रेरणा दिली आणि त्या दृष्टीने सर्व सामान्य माणूस देश आणि समाज या विषयी विचार करु लागलेला होता.

साहित्यिक क्षेत्रात या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील परिवर्तनाचे वारे वाहू लागले होते. त्या दृष्टीने बाळशास्त्री जांभेकर, महात्मा फुले, लोकहितवादी, आगरकर, चिपळूणकर इत्यादी विचारवंत साहित्यिकांनी आपल्या वृत्तपत्रीय लेखनातून आणि ग्रंथातून जुन्या रुढ जीवन पध्दतीवर आसूड ओढायला सुरुवात केली होती. आणि त्या दृष्टीनेच केशवसुतांसारख्या लेखकांनी "जुने जाऊ द्या मरणा लागुनी, जाळुनि किंवा पुरुनी टाका" आणि नविन जीवनाच्या बदलाची हाक ऐकण्याची प्रेरणा त्यांनी आपल्या काव्यामधून दिली.

वैचारिक संक्रमणाच्या या कालखंडात साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलू लागला. इंग्रजी साहित्यात ज्या प्रमाणे सर्व सामान्य माणसांच्या भाव भावनांचा आविष्कार झालेला दिसतो तशा प्रकारचे आविष्कारण मराठी वाङ्:मयात होत नव्हते याची जाणीव होऊ लागली. आणि हाच विचार अर्वाचीन कालखंडातील साहित्यिकांमध्ये रुजू लागला. आणि मराठी वाङ्:मयाच्या विविध क्षेत्रात बदल घडून येऊ लागले. त्या वेळी राजकीय विचारांचा प्रभाव जास्त होता तरी सुध्दा साहित्यामध्ये सुधारणावादी विचार येण्याची प्रक्रिया वेगाने सुरु झाली. कथा,

कादंबरी, नाटक, कविता, निबंध, चरित्र, या क्षेत्रात इंग्रजी साहित्याचा प्रभाव पडू लागलेला होता. त्या वेळी लेखक वर्ग मध्यमवर्गीय, पांढरपेशा-वर्गातून निर्माण झालेला होता. त्यांच्या हातून त्या विशिष्ट वर्गाची सुख दु:खे आणि जीवन पध्दती चित्रित होऊ लागली होती.

हरिभाऊ आणि हरिभाऊ युगातील त्यांच्या सारख्या कादंबरी कारांनी उच्चवर्णीय मध्यमवर्गीय जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण केलेले दिसते आणि असे होणे साहजिक आहे. जो लेखक विशिष्ट वर्गातून किंवा वर्गातून निर्माण होतो त्याच्या मनावर त्या त्या वर्गाची जीवन मूल्ये संस्कारीत झालेली असतात. त्या वर्गाचे चित्रण त्यांनी किती प्रांजळपणे आणि एकनिष्ठेने केले आहे हे पाहणे अगत्याचे असते.

या काळातील कथा कादंबरीकारांनी आपापल्या साहित्यकृतीमध्ये कथानक आणि व्यक्ती दर्शन व्यापक स्वरुपात केल्याचे दिसते. कथा कादंब-यांची पार्श्वभूमी व्यापक स्वरुपात असल्यामुळे त्यातील व्यक्तिचित्रे,शब्द-चित्रे ही व्यापक पार्श्वभूमीवर आधारलेली होती आणि त्यातून कांही आदर्श सांगण्याचा प्रयत्न झाला.

लघुकथा आणि लघुनिबंध यातून अशा प्रकारची व्यक्तिदर्शने साकार करण्याचा प्रयत्न झाला. फडके, खांडेकर, माडखोलकर, अनंत काणेकर, कणेकर, सानेगुरुजी, बोकील, दिवाकरकृष्ण, य. गो. जोशी इत्यादी या कालखंडातील लेखकांनी बोधप्रद वाङ्‌मयाची कक्षा ओलांडून वाङ्‌मयीन प्रवाह वास्तवाकडे आणण्याचा प्रयत्न केला.

एकंदरीत मागील मराठी साहित्याचे सामग्र्याने अवलोकन केले असता साहित्य क्षेत्रात अद्भुतता, आदर्शवाद, रंजकता यांच्याकडून वास्तवता तसेच तात्कालीन समाजातील लोकमानसाचा घेतलेला वेध ही वैशिष्ठ्ये दृगोचर होतात. राजकीय आणि सामाजिक प्रबोधनाचा विचार लेखकांच्या ही मनात संघर्ष निर्माण करीत होता.

साहित्य हे समाजाचे प्रतिबिंब किंवा समाजाचा आरसा असतो याची लेखकांना प्रकर्षाने जाणीव होऊ लागली होती. समाजाच्या स्थितीगतीचा, समाजातील वर्गवर्गातील लोकांचा ठावठिकाणा घेण्याची प्रवृत्ती आणि समाजात रूढ असलेल्या विचार कल्पनांचा वेध घेण्याचा प्रयत्न झाला. विशिष्ठ वर्गातील लेखक जरी लेखन करीत होते तरी त्यांनी आपापल्या वर्ग वर्गातील लोकांच्या भाव भावनांचा अविष्कार समर्थपणे साकार केलेला दिसतो. समाजात मोठ्या प्रमाणात असलेला सर्व सामान्य स्तर असून साहित्य क्षेत्रात येण्याचा तो काळ नव्हता. लोक राजकीय स्वातंत्र्याच्या ध्येयाने अधिक भारलेले होते. रूढ जीवनाची कात फेकून टाकण्याचा काळ अजून समोर यावयाचा होता. शिक्षणाच्या आणि सामाजिक सांस्कृतिक चळवळीच्या प्रभावाने सर्व समाज स्तर ढवळून निघण्याचा काळ समीप आलेला होता. तथापी स्वराज्याच्या प्रक्रियेत सर्व सामान्य माणसाला आपल्या अस्तित्वाची जाणीव होऊ लागली होती. आपण ही या समाजातील एक घटक आहोत. समाजाशी आपले कांही तरी नाते संबंध आहेत. या विचारांची देवाण घेवाण होऊ लागली होती. सामाजिक सुधारकांनी सुधारणावादी विचार सतत पेरल्यामुळे समाजाच्या मनात एक सुधारणावादी विचार मूळ धरू लागलेला होता. असे एकंदर महाराष्ट्रीय जीवन पध्दतीवरून

दिसून येते. संक्रमण अवस्थेच्या काळात मराठी कथा अद्भुततेची कात टाकून ती समाजाच्या विविध अंगाचे वास्तव दर्शन घडवू लागली.

समाज प्रबोधकांनी आणि साहित्यिकांनी रूजू घातलेला विचार त्या वेळच्या अनेक लेखकांच्यावर प्रभाव पाडून गेला. अशा लेखकांच्या मध्ये र. वा. दिघे, ग. ल. ठोकळ, लक्ष्मणराव सरदेसाई असे लेखक होते. त्याचबरोबर गांधीजींच्या खेड्याकडे चला या विचाराचा ही मागोवा अनेक लेखकांनी घेतलेला दिसतो. आणि ग्रामीण जीवन साहित्यामध्ये येऊ लागले. त्या दृष्टीने लेखकांनी ग्रामीण कथा, विनोदी कथा, लघुकथा, शब्दचित्रे अशी विविध प्रकारची रचना केल्याचे दिसते.

हरिभाऊ आपट्यांच्या कालखंडापासूनच ग्रामीण आणि अपेक्षित लोकांच्या जीवनाकडे कारूण्याच्या दृष्टीने पाहण्याचा कल सुरू झालेला होता. बहुसंख्य लोक ग्रामीण भागात राहतात त्या ग्राम जीवनाकडे साहित्यिकांचे लक्ष लागलेले होते. त्यांच्या ही जीवन पध्दतीचे एक वेगळ्या प्रकारचे चित्रण कथा कादंब-यांमध्ये चित्रित झालेले दिसते. परंतु चित्रित झालेले हे ग्रामीण जीवन सूक्ष्मतेने आणि त्याचे विविध पदर दाखविणारे चित्रण दिसत नव्हते. कारण त्या वेळी अशी समजूत होती की ग्रामीण जीवन हे साहित्याच्या क्षेत्रामध्ये कसे चित्रित करावे याची सुजाण बैठक झालेली दिसत नव्हती. ग्रामीण भागात शेतकरी, शेतमजूर, बारा बलुतेदार, दलित, उपेक्षित असे जीवन जगणारे लोक मोठ्या प्रमाणात होते. त्यांच्या ही दैनंदिन जीवनात संघर्षाचे, राजा-लोभागाचे, दैन्य दारिद्र्याचे, प्रीती भक्तीचे प्रसंग असू शकतात याची जाणीव साहित्यिकांना होऊ लागली होती. दिघे, ठोकळ, घोरपडे, सरदेसाई सारख्या लेखकांनी

ग्रामीण भागातील विशिष्ट जीवन रंगविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

नागरी लेखकांनी वर्णन केलेले हे ग्राम जीवन हे आदर्शवादी आणि वरचेवर उलगडून दाखविण्याचा प्रयत्न होता. परंतु त्या ग्रामीण माणसाच्या मनातील भाव-भावनांची खळबळ मोठया प्रमाणात असते याची जाणीव मोठया प्रमाणात चित्रित झाली नाही. एक गोष्ट मात्र योग्य झाली असे वाटते की, शेतकरी आणि उपेक्षितांचे जीवन साहित्यामध्ये येऊ लागले हे सुचिन्ह मानावे लागेल. ग्रामीण जीवन हे साहित्याचा विषय होऊ शकते याची जाणीव झालेली दिसते. त्या वेळच्या साहित्यिक आणि टीकाकारांना सुध्दा असे वाटत असावे की ग्रामीण भागातील उपेक्षित, पिडीतांच्या जीवनात असे कोणते संघर्ष असतात, कोणत्या समस्या असतात की जेणे करून त्यावर कथा कादंब-यांची निर्मिती करावी ? परंतु काही लेखकांनी ग्राम जीवन हे किती व्यापक आणि विविध आहे. त्यांचा संघर्ष ही किती जीवघेणा आहे. व्यक्ती आणि परिस्थिती यांचा झगडा किती पराकोटीचा असतो याची जाणीव होऊन काही लेखकांनी हे संघर्ष टिपण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

दलित, उपेक्षित तर साहित्य क्षेत्राच्या बाहेरच होते. उच्चवर्णीय लेखकांच्या मनावरील संस्कार, अनुभूतीची क्षमता लक्षात घेता हे घडणे साहजिक होते. त्या त्या स्तरातील लोक शिक्षित होऊन आपापल्या जीवन पध्दतीचा वेध घेतात तेव्हाच त्यांना आपल्या स्तराची आणि जीवन संघर्षाची जाणीव होते. ही जाणीव स्वातंत्र्योत्तर काळात दलित,

उपेक्षितांच्यामध्ये महात्मा फुले, महर्षि शिंदे, डॉ. आंबेडकर, राजर्षि शाहू महाराज, संभाजीराव गायकवाड, सत्यशोधक समाज इत्यादींच्या मानवतावादी व्यापक धोरणामुळे लोकांच्या मध्ये मोठया प्रमाणात जागृती झाली.

दलित, उपेक्षित ही माणसेच आहेत. ती ही समाजाची घटक आहेत. त्यांच्या ही जगण्याच्या विविध तऱ्हा आहेत याची जाणीव लेखकांना होऊ लागली. ग्रामीण जीवनाच्या चित्रणाच्या पुढ चा टप्पा म्हणजे ग्रामीण भागात राहणारा दलित, उपेक्षित वर्ग त्याकडे काही लेखकांचे लक्ष गेले. दलित उपेक्षितांचे ही जीवन साहित्य क्षेत्रात आले. माटे, माडगूळकरांसारख्या लेखकांनी ग्राम जीवनातील हा दलित वर्ग आपल्या साहित्याचा विषय केला. त्यांच्याकडे समाजाने पाहिले पाहिजे याची जाणीव करुन दिली. त्याचबरोबर दलित, उपेक्षितांमध्ये सांस्कृतिक आणि सामाजिक जागृती आणि जाणीव झाल्यामुळे त्या वर्गातून ही लेखक निर्माण झाले आणि त्यांनी ही आपल्या जगण्याचा विविध तऱ्हा शब्दबध्द केलेल्या दिसतात.

वरील साहित्यिकांनी आपले लेखन करीत असताना समाजातील विविध स्तरांतील व्यक्तिचित्रे, शब्दचित्रे, रेखाचित्रे चित्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. अशी शब्दचित्रे वा व्यक्तिचित्रे १९२० ते २५ च्या दरम्यान लेखन करणारे "कुमार" रघुवीर सामंत यांनी विविध प्रकारचे लेखन केले. जवळ जवळ साहित्याच्या सर्व शाखांना त्यांच्या लेखणीने

स्पर्श केलेला दिसतो. विशेषत: त्यांनी लिहिलेल्या "हृदय", "माणसेवाईक प्राणी पहिले सात", "माणसेवाईक प्राणी दुसरे सात", व "तारांगण" या पुस्तकातील जी शब्दचित्रे म्हणून पुढे रूढ झाली त्याचे लेखन रघुवीर सामंतांनी केलेले आहे.

ज्या कालखंडात शब्दचित्रे किंवा व्यक्तिचित्रे यांच्या कक्षा, सीमारेषा निश्चित झालेल्या नव्हत्या किंवा साहित्य क्षेत्रामध्ये त्या संबंधीची सांगोपांग चर्चा ही आली नव्हती त्या कालखंडात रघुवीर सामंतांनी आपले अनेक व्यवसाय करीत जी व्यक्तिचित्रे लिहिली आहेत ती अत्यंत नाविन्यपूर्ण होती असे म्हणावे लागते.